नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

बीड कृषी हवामान सल्ला

मंगळवार दिनांक – २६.११.२०१९

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक २७ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर, २०१९)				
दिनांक	२७/११	२८/११	२९/११	३०/११	०१/१२
पाऊस (मिमी)	००.०	००.०	००.०	००.०	००.०
कमाल तापमान (अं.से.)	३०.०	२९.०	३०.०	३१.०	३२.०
किमान तापमान (अं.से.)	१७.०	१७.०	१७.०	१९.०	१८.०
ढग स्थिती (आकाश)	स्वच्छ	स्वच्छ	अंशत: ढगाळ	अंशत: ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	७३	६८	६८	७१	६६
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	३५	३०	३३	३८	३८
वा-याचा वेग (किमी / तास)	१२	०९	०८	०९	१०
वा-याची दिशा	दक्षिण	आग्नेय	आग्नेय	आग्नेय	आग्नेय

हवामानाचा इशारा	जिल्ह्यात पुढील पाच दिवसात हवामान कोरडे राहुन किमान तापमान किंचीत घट होण्याची शक्यता आहे.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
कापूस	वेचणी अवस्था	कापूस पिकाची फरदड घेऊन नये. वेचणीस तयार असलेल्या कापूस पिकाची वेचणी करून घ्यावी. कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी पिकात हेक्टरी पाच कामगंध सापळे लावावेत. तसेच थायोडीकार्ब ७५ डब्ल्युपी २० ग्रॅम किंवा इमामेक्टीन बन्झोएट ५ टक्के एसजी ४ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
तुर	फुलधारणा ते शेंगा धरणे अवस्था	तुर पिकावर अळयांचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के २० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४.४ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
करडई	वाढीची अवस्था	करडई पिकावर पानावरील ठिपके रोगाचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब ७५ डब्ल्युपी २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
रब्बी ज्वारी	वाढीची अवस्था	रब्बी ज्वारीची पेरणी करून २० दिवसाचा कालावधी झाला असल्यास पिकात कोळपणी करून तणनियंत्रण करावे.
केळी	वाढीची अवस्था	केळी बागेत तण नियंत्रण करून पाणी व्यवस्थापन करावे. केळी बागेस खताची शेवटी मात्रा दिली नसल्यास प्रती झाड ५० ग्रॅम नत्र + ५० ग्रॅम पालाश देऊन बागेस पाणी दयावे.
द्राक्ष	वाढीची अवस्था	द्राक्ष बागेत विरळणी करावी तसेच द्राक्ष बागेतील तणांचे व्यवस्थापन करावे.
भाजीपाला	फळवाढीची अवस्था	वांगी पिकावर पांढरी माशीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा फेन्प्रोपॅथ्रीन ३० ईसी ५ मिली किंवा थायामिथॉक्झाम २५ डब्ल्युजी ४ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

फुलशेती	लागवड	बाजारपेठेत ॲस्टर, गॅलार्डिया फुलांना चांगली मागनी असते. येत्या काळातील बाजारपेठ लक्षात घेऊन टप्प्याटप्याने या फुलांची लागवड करावी.
पशुधन व्यवस्थापन	--	पशुधनावर विशेषत: गोवर्गीय पशुवर गोचीडाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे याच्या भौतीक व्यवस्थापनासाठी गव्हाणीतील व गोठयातील गोचीडांची अंडी गोळा करून गोठयाबाहेर शेकोटी करून जाळून टाकावेत.

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.